ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ५०

मयुरेश सोहोनी

(इ. १०वी १९८१

इ. १२वी १९८३)

दि. ९ जानेवारी २०२२

बँकेच्या भारतातल्या सर्व ग्रामीण शाखांच्या संगणकीकरणाचे एक मोठे काम मी केलेल्या एका प्रयोगाने सुरू झाले. पश्चिम महाराष्ट्रातल्या सात जिल्ह्यांच्या ११६ ग्रामीण शाखांचे संगणकीकरण माझ्या नेतृत्वाखाली पूर्ण झालं. या आनंदात जेव्हा मी वडिलांना ती गोष्ट सांगायला गेलो तेव्हा त्यांनी एक प्रश्न विचारला, की काम तू एकट्याने केलस का? आणि पटकन डोळ्यासमोर आलं की या कामात हजारो हात सहभागी आहेत. हे माझ्याकडून घडायचे होते म्हणून माझी त्या ठिकाणी नेमणूक झाली हे त्यांनी अहंकार येऊ नये म्हणून जाणवून दिलं.

वं. आप्पांच्या अनेक आठवणी आहेत. त्यातली एक अविस्मरणीय गोष्ट, मी तेव्हा सातवी–आठवीत असेन. एक दिवस शाळा आणि दल याच्या मधल्या वेळात आप्पा मला चतु:शृंगीला घेऊन गेले. तिथल्या पायऱ्यांवर बसून एक प्रश्न विचारला. एक ना एक दिवस प्रबोधिनीचे 'रूप पालटू देशाचे', हे स्वप्न पूर्ण होईल मग प्रबोधिनी बंद करायची का ? मी प्रश्न ऐकून गडबडून गेलो आणि प्रबोधिनी बंद करायची ही कल्पनाच मला सहन झाली नाही आणि उत्तर दिलं बंद नाही करायची ! मग बंद नाही करायची तर मग पुढे काय करायचे ? मला काहीच उत्तर सुचले नाही. त्यावर त्यांनी सांगितलं, की भारत विश्वगुरु बनेल तेव्हा प्रबोधिनीने योगी अरविंदांच्या विचाराप्रमाणे मानवाचा महामानव कसा होईल यासाठी काम करायचे. मी तेव्हा नसेन आणि तुम्ही पण म्हातारे झाले असाल तर तुम्ही हे पुढच्या पिढीपर्यंत पोचवायचे आहे. हा आप्पांचा इतकी वर्षं मनात बाळगलेला संदेश मी आज सर्व प्रबोधकांपर्यंत या लेखाद्वारे पोचवत आहे.

**प्रशाला– युवक  विभाग**



प्रकल्प प्रदर्शन

प्रशालेत मी  पाचवीत प्रवेश घेतला. माझे काका कै. आप्पाराव सोहोनी व प्रबोधिनीचे संस्थापक संचालक आप्पा पेंडसे यांची रा. स्व. संघामुळे दीर्घकाळ मैत्री होती. प्रबोधिनीच्या स्थापनेपूर्वी 'राष्ट्र जागृती मंडळा' च्या कामात माझ्या काकांचा सक्रिय सहभाग होता. त्यामुळे वं. आप्पा अनेकवेळा आमच्या घरी/वाड्यात येत असत. प्रवेश चाचणीत उत्तीर्ण झाल्यानंतर माझ्या आई-वडिलांना थोडी  शंका वाटत होती, की प्रशालेच्या १२-१४ तासाच्या भरगच्च उपक्रमांना मी पुरा पडू शकेन किंवा नाही. कारण लहानपणी मला पोलिओसारखा आजार झाल्याने मी शारीरिक दृष्ट्या थोडा कमकुवत होतो. त्यांना ही थोडीशी धास्ती वाटत होती. ती. भाई (स्व. विवेकानंद फडके) यांनी त्यांना विश्वास दिला, की आम्ही त्याची योग्य ती काळजी घेऊ.
प्रबोधिनीच्या वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण पद्धतीतूनच घडण असं म्हणताना ५वी /६वी मध्ये माझी थोडी ओढाताण होत होती. पण ७वी पासून सर्व उपक्रम sustain झाले/ आवडू लागले. विशेष / वेगळे केलेले प्रकल्प आजही आठवतात. त्यात गांधीजींच्या पोषाखात त्यांच्या विचाराप्रमाणे झालेले परिवर्तन, विविध प्रकारच्या दिव्यांचा अभ्यास, सर्व धर्मांचा अभ्यास आणि १०वी मध्ये गीत रामायणाचा रसास्वाद. या प्रकल्पाच्या प्रदर्शनात आप्पांनी प्रश्न विचारला होता, तुम्ही कधी असे काव्य रचणार ?

**दीक्षा ग्रहण समारंभात – विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून आयुष्यातील प्रथम भाषण**



**विस्तार शिबिरात बोलताना**

प्रबोधिनीतील घडण्याच्या अनेक आठवणी आहेत. अगदी योगायोगाची गोष्ट म्हणजे आज माझी मुलाखत होत असताना (शनिवार, २५ डिसेंबरला प्रशालेत दीक्षाग्रहणाचा कार्यक्रम होतो आहे.) बरोबर ४३ वर्षांपूर्वी याच दिवशी माझी आमच्या दीक्षाग्रहणानंतरच्या सभेत, विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून वं. आप्पांनी निवड केली. घसरणाऱ्या मला आप्पांनी जणूकाही घोड्यावरच बसवले ! मी तसा त्या वेळेस मुखदुर्बळ होतो, फक्त ऐकावे व कमी बोलावे हे माझे प्राधान्य. अशात मला सर्वांसमोर बोलायला सांगितल्यामुळे माझी फजिती तर होणार नाही, अशी भीती !!  आप्पांनी धीर दिला, दोन-तीन दिवस अगोदर तयारी करून घेतली व प्रत्यक्ष कार्यक्रमात मी बोललोही.  एक-दोन वाक्ये सुरुवातीला घाबरलो, पण तिथेच बसलेल्या आप्पांकडे पाहिल्यावर मला धीर आला आणि नंतर भाषण उत्तम झाले. त्यावेळेस जी वक्तृत्व कला बाणली, ती आजपर्यंत! आता मी बँकेत व अन्य कार्यक्रमांत ऐन वेळेस ही 'उत्तम बोलतो' अशी दाद कायम मिळत असते ! हे आहे वं. आप्पा व प्रबोधिनीनं घडवणं.

नववीमध्ये मला एक व्यक्ती कार्य दिलं होतं. तेव्हा भारतात पेट्रो डॉलर्स येऊन मिनाक्षीपूरम्मध्ये मोठ्या प्रमाणावर धर्मांतर सुरू झाले होते. पुण्यातले भवानी पेठेतले आमदार अमिनुद्दीन पेनवाले यांची  जाऊन मुलाखत घ्यायची आणि पैशाच्या अमिषाने धर्मांतर होणे हे बरोबर नाही असे त्यांना सांगायचे हे कृती कार्य दिले होते. मी एखाद्या मोठ्या व्यक्तीशी अशा स्फोटक विषयावर बोलणे खूप अवघड होते. मी कितीही लपवायचा प्रयत्न केला तरी कोणी तरी ओळखले की मी प्रबोधिनीचा विद्यार्थी आहे. त्यांनी माझे म्हणणे ऐकून घेतले. पण हा विषय कळायला तू अजून लहान आहेस असे सांगून बोळवण केली.

वं. वामनरावांच्या अनेक आठवणी आहेत, त्यापैकी ही एक खास आठवण. आम्ही १०वीत असताना जीवशास्त्राच्या शिक्षिकांना अर्ध्या वर्षानंतर परदेशात जायची संधी मिळाली,  म्हणून त्यांनी भराभर अभ्यासक्रम पूर्ण केला. आम्हाला बऱ्याच गोष्टी समजल्या नाहीत त्यामुळे प्री-प्रिलीमला पेपर लिहिता येणार नाही अशी तक्रार आम्ही वामनरावांकडे केली.  तुम्ही आता पेपर द्या मग बघू असं सांगून थोडावेळ ते वर्गाबाहेर गेले. एकानी पुस्तक काढल्यावर सगळ्यांनीच पुस्तक काढली. वर्गात परत आल्यावर त्यांनी हे पाहिलं, तेव्हा त्यांना खूप मोठा धक्का बसला. ते म्हणाले, ''मी मोठा विश्वास टाकून गेलो होतो. प्राचार्य म्हणून हे माझ खूप मोठे फेल्यूअर आहे असं मला वाटतय''. यावर त्यांनी सांगितले, की ''आत्ता बघूनच लिहा पण उत्तीर्ण होण्यासाठी आता ९५ गुण मिळवावे लागतील''. याचं मला स्वत:ला खूप दु:ख झाले, की मी संस्कारात कमी पडलो अस

वाटल आणि वामनरावांकडे जाऊन स्वतःहून शिक्षा घेतली. त्यावर ते म्हणाले, ''की मला खात्रीच होती संपूर्ण वर्गातून आपण चुकलोय हे तुला नक्की उमजेल .... आणि तू स्वतःहून शिक्षा घ्यायला येशील''. पुढे एकदा कसोटीचा प्रसंग आला. मी लोणावळ्याला नोकरी करत असताना येताजाता प्रवासात ९ पैकी ५ विषयांचा अभ्यास करून झाला. बाकीचे पेपर तसेच द्यायचे असं ठरवून पेपरला गेलो. मला काहीच येत नाहीये असं बघितल्यावर सुपरवायझरनी चौकशी केली. एक पूर्ण झालेला पेपर कॉपी करण्यासाठी दिला, त्याला मी ठाम नकार देऊ शकलो. मला कधीही 'माझी मार्कलिस्ट' बघताना ती माझीच वाटली पाहिजे अशी भूमिका घेतली.

एकदा वं. एकनाथजी रानडे प्रबोधिनीत आले असताना मला शाळेत बोलावले होते. आप्पा सगळ्या कार्यकर्त्यांची ओळख करून देत असताना 'हे आमचे सगळ्यात छोटे कार्यकर्ते' अशी माझी ओळख करून दिली होती. त्यांना इतकी खात्री होती की मी पुढे प्रबोधिनीचे काम करीन. आजही ही गोष्ट मला सतत प्रेरणा देत असते. थोडा जरी रेंगाळलो, निवांत झालो, की आतले 'वं. आप्पा' आठवण करून देतात, अजून तर फक्त टीचभर काम झालं आहे अशी!

**आरंभ महाविद्यालयात शिकताना व नंतर दोन वर्षे**

११वीमध्ये असताना समाज ऐक्य समितीद्वारे बीड-अंबाजोगाई येथे मी व श्रीरंग भातखंडे यांनी बैठका घेतल्या. तिथल्या प्राध्यापकांना वर्षभराचे नियोजन करून दिले. तिथे एका महाविद्यालयात एक लक्षात राहील असा प्रसंग घडला. समाज ऐक्य वगैरे बोलणे सोपे आहे पण तुम्हाला जर गळ्यातले जानवे काढून टाकायला सांगितले तर काढाल का ? असा प्रश्न एका ज्येष्ठ व्यक्तीने विचारला त्यावर, 'मी हे विद्येचे व्रत घेतले आहे, त्याची आठवण राहावी म्हणून जानवे घातले आहे. पण आता ते व्रत अंगात इतके मुरले आहे की हे काढून टाकले तरी बिघडत नाही' असे उत्तर देऊ शकलो. अकरावी हे माझ्यासाठी सर्वोत्कृष्ट वर्ष होते. पण अकरावीत मागे पडलेल्या मित्रांचा बारावीचा अभ्यास करून घेताना मला स्वतःला कमी मार्क पडले. त्यामुळे इंजीनियरिंगला प्रवेश मिळाला नाही आणि स. प. महाविद्यालयात बी.एस्सी.ला प्रवेश घेतला. मला 'मार्क' कमी होते तरी हितचिंतकांनी देऊ केलेल्या आर्थिक मदतीवर मी खाजगी इंजीनिअरिंग कॉलेजमध्ये जायला नकार दिला.

उपासना मंदिरात गूढ शांतता आहे
समई मंद तेवत आहे,
वातावरणात सुगंध आहे.
कारण आयुष्यभर झिजलेला,
भव्य-दिव्य स्वप्ने पाहून
मातृभूला भूषण झालेला
असा हा महामानव,
येथे चिरविश्रांती घेत आहे.
चेहऱ्यावर मंद स्मित विलसत आहे.
कार्यकर्त्यांबद्दल विश्वास आहे,
म्हणून निश्चिंतपणे तो विसावला आहे.
चैतन्यरूप तो झाला आहे.
हृदींची स्वप्नं आम्हांला देऊन,
स्वप्नपूर्तीची शिकवण देऊन,
महायात्रेला तो निघाला आहे.
हिंदुभूपदी विसावला आहे.
हे आद्य संचालक, पुरी करू तव मनीची आस,
कारण आता स्वप्नपूर्ती हाच आमचा ध्यास.
तुम्ही शिकविल्याप्रमाणे शपथ घेतो आज,
की आता इथून पुढे धरू राष्ट्रकार्याचा हव्यास.

– मयुरेश सोहोनी

– ती. आप्पांच्या स्मृतीस वाहिलेली श्रद्धांजली. (पूर्वप्रकाशन १९८४.)

१९८५च्या मे महिन्यात धुळे येथे १०० विद्यार्थ्यांचं सात दिवसांचं विस्तार शिबिर मी (प्रमुख), मुकुंद खिस्ती व प्रसाद दिवेकर बरोबर घेतले. क्रिडांगण सुद्धा न मिळालेल्या स्थितीत तिथे पोचलो. पण दोन दिवसांत सर्व व्यवस्था तसेच शाळांमधून पुरेशी प्रसिद्धी देऊन, ४०,७० असं करत-करत १०० जणांचं सकाळ व संध्याकाळ असं विस्तार शिबिर घेतलं.



**धुळे येथील युवक विभागाचे विस्तार शिबिर – सर्वात उजवीकडे प्रा. बिरारी – प्रबोधिनीचे धुळ्यामधील केंद्रप्रमुख**

कॉलेजच्या पहिल्या दोन वर्षांत पुण्याच्या पूर्व भागात दल घ्यायची जबाबदारी मला दिली होती. कबीर दल, मंगळवार पेठ, (बाबूराव सणस विद्यालय), सावित्रीबाई फुले प्रशाला - टिंबर मार्केट (टागोर दल) या दोन दलांची जबाबदारी माझ्याकडे होती. याशिवाय सरस्वती दलाचे डबघाईला आलेले मैदान व दल पुन्हा उभे केले.

मी स्वत: पंजाब दौऱ्याला गेलो नव्हतो पण नंतर तिथून आलेल्या 'ग्रंथि'च्या गटाचे पुण्यातील नियोजन माझ्याकडे

होते. पुण्यातील गणेशोत्सवात कार्यक्रम योजण्याची जबाबदारी म्हणजे त्यांच्या  कसबा / जोगेश्वरी / दगडूशेठ / केसरीवाडा या मानाच्या गणपती मंडळातील ज्येष्ठ सदस्यांची भेट आणि चर्चा घडवून आणणे.  पुणे मराठी ग्रंथालयात एक दिवस वार्तालाप, इ. या दौऱ्याच्या शेवटच्या दिवशी प्रबोधिनीला एखाद्या गुरुद्वाराचं स्वरूप आलं होतं. उपासना मंदिरात गुरु ग्रंथ साहिबचे पठण चालू होते. त्या दिवशी प्रबोधिनीत 'लंगर' होते. पुण्यातल्या सर्व शीख वस्त्या शोधून सगळ्यांना निमंत्रण दिले होते. लंगर म्हणलं की मोठ्या प्रमाणात स्वयंपाक होणार. आचारी त्यांच्या सर्व सामना सह हजर होते. रात्री अडीच वाजता तयारीचा आढावा घेताना लक्षात आले की स्वयंपाकासाठी लागणारा लाकूड फाटा दिसत नाहीये. ज्याच्यावर ही जबाबदारी होती त्याने सांगितले की मिळाला नाही. मध्यरात्री लाकडे कुठे मिळू शकतील याचा विचार करून लाकडे मिळवली आणि लंगर व्यवस्थित पार पडले.

SY B.Sc. physics चे शिक्षण चालू असताना युवक विभागाच्या कामात मी पूर्ण बुडून गेलो होतो. दलांचे व अन्य उपक्रम, संचालकांचा स्वीय साहाय्यक अशी कामेही करत होतो. पण त्याच वेळेस काही घरगुती कारणाने मला नोकरी करण्याची आवश्यकता होती. वडिलांच्या सेवानिवृत्ती नंतर घरात माझ्यावर काही जबाबदारी आली होती. त्यामुळे स्टेट बँक ऑफ इंडियाची परीक्षा दिली.  लेखनिक पदासाठी मी निवडला गेलो. पहिली नियुक्ती झाली ती लोणावळा शाखेत. सायकलने स्टेशनपर्यंत जाणे, लोकल प्रवास करून बँकेत पोचणे, बँकेत काम, परतल्यावर सायकलने येऊन दल घेणे असे दोन वर्षे केले. त्यात ओढाताण होत होतीच पण आनंद ही भरपूर होता. दरम्यान च्या काळात SY B.Sc. Physics मधून SY B.Sc. (Mathematics) अशी शाखा बदलली. कारण नोकरीमुळे प्रॅक्टिकलसाठी प्रयोगशाळेत उपास्थित राहणे अशक्य होते. नोकरीच्या काळात पुणे- लोणावळा-पुणे लोकल प्रवासात गणिताचा अभ्यास पूर्ण करत असे. महाविद्यालयातील शिक्षकांनीही उपस्थितीची थोडी सूट दिली व अभ्यासात ही मार्गदर्शन केले. नोकरी करत-करत मी B.Sc. पूर्ण केले.

**योग: कर्मसु कौशलम्**

स्टेट बँकेमध्ये लेखनिक पदासाठी निवड झाल्यानंतर प्रबोधिनीचे युवक विभागाचे पूर्ण वेळ काम करण्यामध्ये मर्यादा येणार हे मला कळत होते. जवळपास दीड वर्षे माझ्या मनात हे द्वंद चालू होते. मा. गिरीशरावांशी या काळात मी अनेकदा बोललो, एकदा तर सविस्तर पंधरा पानी पत्ररूप मनोगत ही लिहिले. हळूहळू मला दिशा सपाडली, की बँकेच्या माध्यमातून प्रबोधिनीत शिकलेले विचार प्रत्यक्षात आणण्याची ही संधी आहे, असे समजून, त्या कामात पूर्णपणे उतरून सहभाग घ्यायचा. स्टेट बँक ही भारतीय अर्थ व्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाची संस्था आहे हे ही तोवर जाणवले होते. लेखनिक म्हणून जरी माझी निवड झाली तरी नंतर CAIIB च्या परीक्षा व अन्य परीक्षा देऊन व्यवस्थापक श्रेणीची  देशपातळीवरील अवघड परीक्षा पास होऊन, पुढच्या पायरीवर जाऊन काम करता आले. एका वर्षात कामात दोनदा पदोन्नती मिळाली. ग्रामीण, शहरी, मुख्य मोठ्या शाखांमध्ये, औद्योगिक शाखा, Corporate finance, तंत्रज्ञान IT व अशा विविध व वाढत्या जबाबदाऱ्या असणाऱ्या  नेमणूका होत गेल्या.

लेखनिक पदावर १९८५मध्ये सुरुवात केल्याने तर आज DGM[2] and Branch Head या पदावर पोहोचू शकलो, याचेही समाधान आहे. या कारकिर्दीत अनेक सन्मान मिळाले. त्यातल्या चार सन्मानांचा आवर्जून  उल्लेख करतो. मे २००७मध्ये ब्रुसेल्स येथे झालेल्या SWIFT परिषदेत सर्व भारतभरातून एका अधिकाऱ्याची निवड झाली. त्या परिषदेत मी स्टेट बँकेचा भारताचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित होतो. **माझ्या प्रशिक्षणातल्या प्रोजेक्टला महाराष्ट्र व गोवामध्ये पहिले तर देशपातळीवर दुसरे  पारितोषिक मिळाले. यामुळे हैद्राबाद येथे १९९५मध्ये माझा गौरव होणार होता. त्यावेळेस माझ्या बरोबर कुटुंबातली आणखी एक व्यक्ती असे निमंत्रण होते. बहुतेक वेळा ही व्यक्ती म्हणजे पत्नी असते पण माझ्या पत्नीने सुचवले की मी**



**सर्वात छोट्या ग्रामीण – 'अस्वली' शाखेतील कार्यक्रम**



**बँकेतील सहकाऱ्यांना दक्षतेची शपथ देताना**



**कर्जपुरवठ्यासाठी कारखान्याला भेट**



सहकाऱ्यांनी केलेला सत्कार



नवीन वर्ष २०२२ चे शाखेतील सहकाऱ्यांबरोबर स्वागत



बँकेमध्ये तत्परता आणि पारदर्शकतेचा आग्रह

**आईला बरोबर घेऊन जावे आणि त्याप्रमाणे मी आईला घेऊन समारंभाला गेलो. माझ्या सर्व सहकाऱ्यांसमोर हा सत्कार झाला हे पाहताना आईलाही खूप आनंद झाला (आई मंगला सोहोनी).** स्टेट बँकेचा प्रतिनिधी म्हणून ब्रुसेल्स, हाँगकाँग आणि सेऊल या तीन ठिकाणी जायची आणि तिथल्या परिषदांमध्ये सहभाग घ्यायची संधी मिळाली.

तिसरा पुरस्कार २०१३ साली स्टेट बँकेमध्ये सर्व देशात 'Corporate Finance Vertical' मध्ये Best Relationship Manager म्हणून सन्मान झाला. आणि चौथा २०२१मध्ये स्टेट बँकेच्या अध्यक्षांच्या हस्ते सर्व विभागातील उत्तम कामगिरीबद्दल सन्मान मिळाला.

सध्या मी बेंगळुरू येथे आहे. बेंगळुरूच्या शाखेत काही नव्या पद्धती सुरू केल्या. बँकेत आल्यावर समोरच दिसेल असे 'योग कर्मसु कौशलम्' हे मोठ्या अक्षरात पाटीवर लावले. रोज सकाळी आल्यावर कोणत्याही धर्माची / भाषेतली प्रार्थना म्हणायची. त्यानंतर स्टेट बँकेचं व्हिजन आणि मिशन स्टेटमेंट म्हणायचं. त्यानंतर कोणीही कोणत्याही विषयावर पाच मिनिटे बोलयचे. यातून बऱ्याच गोष्टी साध्य होताना दिसतात.

अनेक जागतिक व भारतीय उद्योगांना हजारो कोटी रुपयांचा पतपुरवठा व सेवा देणाऱ्या आमच्या बँकेच्या अशा महत्त्वाच्या Corporate Accounts ची जबाबदारी मी व माझ्या सहकाऱ्यांकडे आहे. या सर्वच खातेदारांची नावे मी गोपनीयतेमुळे सांगू शकणार नाही पण या सर्वच उद्योग व्यवसायांच्या वाढीमध्ये आमच्या बँकेचे योगदान आहे, याचा अभिमान व आनंद वाटतो.

**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सुरुवात व स्टेट बँक ऑफ इंडियाचे कर्जसाहाय्य**

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाची सुरुवात व त्यासाठी स्टेट बँकेकडून इमारत व यंत्रसामुग्रीसाठी अर्थसाहाय्य हा मोठा संस्मरणीय अनुभव होता/आहे. जागेशिवाय दीनानाथ रुग्णालयाकडे काहीच नव्हते. डॉक्टरांचा संचही जरी कुशल असला तरी नवा होता. ट्रस्टी किंवा डॉक्टर्स यांनी व्यक्तिगत जामीन म्हणून राहणेही अशक्यप्राय होते. केवळ ध्येयवाद व प्रेरणा यांच्या बळावर बँकेचे कर्ज कसे मिळणार? त्यावेळेस मी पुण्यात टिळक रोड शाखेत होतो. पद- अधिकार याचा विचार करता निर्णय घेणे माझ्या कार्यकक्षेत किंवा अधिकारात नव्हतेच. त्यावेळेस अशा रुग्णालयांना कर्ज देण्याचीही बँकांमध्ये प्रथा नव्हती, पूर्वानुभव नव्हता. जवळपास तीन ते चार महिने डॉ. धनंजय केळकर, सीए असलेले प्रबोधिनीचे आणखी एक विद्यार्थी शशांक चांदोरकर व मी विविध प्रकारे प्रस्ताव तयार करत होतो. खूप प्रयत्न करूनही यश मिळत नव्हते. मग आम्हालाच एक शेवटचा तोडगा सुचला, ज्यांना दोनही बाजू माहिती आहेत म्हणजे स्टेट बँक - त्याची कार्यपद्धती व ज्ञान प्रबोधिनी त्यांचे कार्यकर्ते- अशा कोणीतरी ज्येष्ठ व्यक्तीने शब्द टाकला तर हे काम पूर्ण होईल व कर्जाचा प्रस्ताव पुढे संमत होईल. योगायोगाने श्री. भास्करराव गद्रे हे स्टेट बँकेमधील



पुण्यातील दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलसाठी स्टेट बँकेमधून केलेल्या कामानिमित्त भारतरत्न लता मंगेशकर यांच्याशी परिचय करून देताना डॉ. धनंजय केळकर

वरिष्ठ निवृत्त अधिकारी यांना भेटलो. प्रस्ताव पुढे सरकला, कर्ज मान्य झाले. रुग्णालयाने पाच वर्षांच्या कालावधीच्या कर्जाची निम्या वेळेतच परतफेड केली. माझी पत्नी सौ. मेधा, एम.कॉम आणि पत्रकारितेत पदवीधर आहे, तिचीही बहुमूल्य मदत झाली. ती दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलची पहिली कर्मचारी आहे. संजीवनमध्ये तिला या कामाचा अनुभव होताच. परमेश्वर कृपेने सर्व गोष्टी जुळून आल्या. आज मागे वळून पाहताना, प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याचे तीन-चार महिने ठळकपणे आठवतात. प्रबोधिनीचे संस्कार आणि बँकेतील कारकीर्द प्रबोधिनीत शिकलेली मूल्यव्यवस्था व तत्त्वांची शिदोरी - बँकेत अनेक पदांवर, वेगवेगळ्या विभागात, नव-नवीन ठिकाणी, प्रत्येक वेळेस काम करत असताना भक्कमपणे वापरता आली. त्याचे अनेक किस्से सांगता येतील.

एका मोठ्या शहरातील एका शाखेत काम करत असताना तेथील कामगार व अधिकाऱ्यांच्या संघटनेने शाखा अधिकाऱ्यांना जणूकाही वेठीस धरले, की ३१ मार्चचे क्लोझिंग करण्यासाठी अतिरिक्त वेळ थांबतो, पण त्याच्यासाठी नंतर तीन दिवसांची अतिरिक्त सुट्टी सर्वांना मिळावी. मी युनियनबाजी - शाखा बंद पाडणे याच्या विरोधात होतो. बँकेचे कामकाज चालू राहिले पाहिजे, बंद पडता कामा नये. आमच्या त्या शाखाधिकाऱ्यांना मी सांगितले, की ३१ मार्चची (आर्थिक वर्षाच्या नोंदी करण्याचे काम, closing entries) सर्व जबाबदारी मी एकटा पूर्ण करीन, त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, मला ते काम सोपवावे. पण त्यांचा विश्वास तरी कसा बसणार? कारण मी तुलनेने कमी अधिकाराच्या पदावर होतो. त्यांनी माझी परीक्षा म्हणून सांगितले की १५ फेब्रुवारी पर्यंत depreciation नोंदीच्या सर्व entries व vouchers तयार करून ठेव. १३, १४ व १५ फेब्रुवारी हे तीन दिवस सर्व अभ्यास करून, एकहाती, रात्री तीनपर्यंत काम करून सगळ्या नोंदीचे काम मी पूर्ण केले. त्यांचा विश्वास बसला. सहकाऱ्यांच्याही लक्षात आले, की किचकट कामाचा फार बागुलबुवा न करता हा अधिकारी काम करू शकतो. त्यांचा दबाव पूर्ण कमी झाला. शहरातील इतर सर्व शाखांमध्ये तोंडोपतोंडी माझ्या कामाचा गवगवा झाला.

आणखी एका शहरात एक प्रसिद्ध उद्योजक व्यवसाय वृद्धीसाठीच्या (working capital) कर्जाचे कागदपत्र घेऊन आले. माझ्या अभ्यासाप्रमाणे त्यांची गरज ८६ लाख रुपयांची होती. ते त्यांना कळवल्यावर ते मला भेटायला आले, अमकी बँक सव्वा कोटी देतेय, तमकी दीड कोटी असे कागदपत्र ते मला दाखवून देऊन पटवण्याच्या प्रयत्नात होते. त्यांना मी शांतपणे सांगितले की बँकेचे कर्ज घेणे हे दुधारी शस्त्र आहे ! स्टेट बँकेकडे पैशांची कमतरता नाही पण गरजेपेक्षा जास्त कर्ज घेऊन त्यांचाच व्यवसाय व्याजाच्या ओझ्याखाली गुदमरणार आहे. कमी कर्जात ही उलटा त्रास होईल. त्याऐवजी 'आवश्यक तेवढेच कर्ज घेऊन' व्यवसाय वाढवा. त्यांना माझे अभ्यासपूर्ण म्हणणे पटले. आज ते त्यांचा व्यवसाय अनेक पटीने वाढवून आमचे उत्तम ग्राहक आहेत आणि त्या संवादानंतर माझे व्यक्तिगत मित्रही ते झाले.

आणखी असाच एक अनुभव एका सहकारी साखर कारखान्याच्या कर्ज वितरण प्रक्रियेत आला. मी त्या शाखेत येण्यापूर्वी सर्व प्रक्रिया पूर्ण झाली होती पण कर्ज वाटपाची (disbursement) शेवटची पायरी होती. एकूण १७ कागदपत्रे बँकेत जमा केल्यावर कर्जाचे धनादेश द्यायचे इतकेच काम होते. कर्ज तर पूर्वीच संमत झाले होते. पण १८० एकराची कारखान्याची जागा तारण ठेवण्याच्या कागदावर सह्या असलेला कागद तगादा लावूनही हा कारखाना देत नव्हता. एक सुप्रसिद्ध महिला नेत्या अनेकदा भेटायला येऊन धनादेश देण्याची गळ घालत होत्या. दिल्लीहूनही एक-दोनदा फोन आले की काम पूर्ण करा, पण एवढ्या दबावानंतरही १७ प्रकारची कागदपत्रे (ज्यात जमीन गहाण बँकेच्या नावाने असणे हे सर्वात महत्त्वाचे कागदपत्र होते) मिळेपर्यंत मी धनादेश दिले नाहीत. अखेरीस माझ्या आग्रहाने १८० एकर जमिनीचे 'तारण' रितसर झाले व मगच कर्ज दिले गेले. त्यामुळेच पुढे तो कारखाना तोट्यात गेल्यावर आमच्याकडे बँक म्हणून, जमिनीची तरी मालकी शिल्लक राहिली.

एका ग्रामीण शाखेत दोन वर्षे काम करताना अगदी नवीन अनुभव आले. शेळ्या-कोंबड्यांच्या कर्जात ही सरकारी यंत्रणेने काही गैरप्रकार चालविले. आजूबाजूच्या बारा गावांमध्ये आदिवासी लोकसंख्या जास्त होती. कर्ज घेतल्यानंतर त्यांची वसूली होणे हे जिकिरीचे होते. बरिचशी कर्जे Non Performing Assets (NPA) यात येत होती. प्रयत्नपूर्वक सर्व कर्जाची



**स्टेट बँकेच्या सीएसआर अंतर्गत बंगलोर येथील गरीब वस्तीतील दोन शाळांना कॉम्प्युटर सिस्टीम भेट देताना**



**बंगलोर येथील शाळेतील विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना**

वसूली केली. तीनशे हून जास्त शेतकऱ्यांना कॅनॉलमधून पाईपलाइनने पाणी आणून शेती सुधारण्यासाठी कर्ज वाटप केले. गैरप्रकार पूर्णपणे मोडून काढले. दोनच वर्षात मी अधिकारी असलेली ती शाखा शून्य NPA म्हणून प्रसिद्ध झाली. तसेच मी जाणीवपूर्वक दिलेल्या मोटर पाईपलाईन मुळे आजूबाजूच्या अनेक गावांत दुष्काळ असताना पाण्याची मुबलकता झाल्याने त्या गावाची तरी दैना झाली नाही. त्याच काळात सरकारी योजनांचा खरा व चांगला उपयोग करून औषधाची दुकाने, एस्‌टीडी बूथ, डॉक्टर क्लिनिक अशा उपयोगी गोष्टी या गावांमध्ये आणल्या व त्यांना कर्ज पुरवठा केला.

आणखी एका शहरात असताना एका ATM मध्ये जवळपास ४० लाखांचा गैर व्यवहार आम्ही उघडकीस आणला. सुमारे दोन वर्षे तरी हा गैर व्यवहार चालू होता. म्हणजे ATM मधून कोणी तरी पैसे काढून नेत होते पण त्याची नोंद होत नव्हती. बँकेतील दोन अन्य यंत्रणांमधील नोंदी व ATM मधील रकमांचे समायोजन होत नव्हते. मला व सौ. हेमा बापट या स्सिटीम प्रोग्रॅमरला ते लक्षात आल्यावर या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन हा गैरव्यवहार कसा होतोय, हे शोधले. त्याचे परिस्थितीजन्य अनेक पुरावे व धागेदारे सापडले, त्याप्रमाणे शहरातील पोलीस खात्यात गुन्हेगारीची तक्रार नोंदवून गुन्हा करणाऱ्या व्यक्तीचा छडा लावून ( दुसऱ्या शहरात तो रहायला होता) त्याला अटक करून आणले. पण पोलीसांच्या मते हा अपहार सायबर गुन्ह्यांच्या यादीत नसल्याने भुरट्या चोरी खाली गुन्हेगार लवकर सुटला असता. या प्रकारचा गुन्हा सायबर क्राईमच्या यादीत येण्यासाठी रिसर्व्ह बँकेकडे मागणी करून असे गुन्हे यादीत आणले.

पुण्यात एका कामाची जबाबदारी पूर्ण करताना नव्याने समाधान देणारा अनुभव मिळाला. हा कालखंड साधारण १९९२-९५ मधला, परकीय चलनाचा साठा देशात तुटपुंजा होता व ते देणारे अनिवासी भारतीय (NRI) हे मोठे ग्राहक आमच्या बँकेपेक्षा इतर परदेशी बँकांना जास्त पसंती देत होते. यावर उपाय योजना करण्यासाठी मी एकूण १५० NRI च्या मुलाखती घेतल्या. work efficiency, volume of transactions, यात आम्ही सर्वात पुढे होतो पण Customer Relationship Management मध्ये आम्ही त्या बँकांच्या तुलनेत जरा कमी पडत होतो. त्यावरून लक्षात आले की जरी आमचे network सवोत्कृष्ट असले व अगदी २५-३० मिनिटांत पैसे पाठविणे सुलभ व्हायचे तरी Relationship Management मध्ये आम्हांला लक्ष घालावे लागणार होते. तसा अहवाल मी वरिष्ठांना दिला, त्यांचे स्वागत झाले व त्यावर कार्यवाहीही झाली.

सुरुवातीच्या काळात काम करताना सजगपणामुळे व व्यवस्थापन कौशल्यामुळे अनेक गोष्टींमध्ये बँकेसाठी काम करता आले. असाच एक प्रसंग म्हणजे एका Non- Banking Finance company चा, त्यांच्या भारत भरातील भागधारकांचे dividend चे धनादेश देण्याचे काम आमच्या बँके मार्फत होत असे. साधारण १९९५च्या काळात संगणक नव्हते, Core Banking तर फारच लांबचा विषय होता. त्यामुळे भारत भराच्या स्टेट बँकेच्या शाखा त्या-त्या ठिकाणी Dividend Warrant च्या रकमा भागधारकांना द्यायच्या. ते सर्व कागद आमच्याकडे आल्यावर असे लक्षात आले, की एक कोटी रकमेचे वाटप आम्ही केले होते. त्यामागे अर्थात गृहीत असे होते की या कंपनीचे आमच्या बँकेतील खात्यात तितकेच पैसे शिल्लक आहेत व त्यातून ही रक्कम वाटली आहे. मी कागद तपासल्यावर असे लक्षात आले की तितकी रक्कम खात्यात शिलक नसताना असे वाटप झाले होते. मी सर्व dividend warrant चे पैसे देता येणार नाहीत, ते नाकारा, असे सांगितले. त्यावर कंपनीस overdraft (तात्पुरता) देऊन ते चुकते करू- असा उपाय सांगितला गेला. मी तो नाकारला. अर्थातच यामुळे केवळ आमच्याच शाखेत नाहीतर मुंबईमध्ये मोठ्या अधिकाऱ्यांपर्यंत ही चर्चा पोचली. 'अमुक कंपनीचे dividend warrants नाकारणारी ही व्यक्ती कोण? अशी खळबळही माजली, चौकशी केली गेली व त्यावर हा सर्व प्रकार बरेच वर्षे चालू होता, असे लक्षात आले. माझ्या सजगतेचे व नियमांप्रमाणे योग्य काळजी घेऊन केलेल्या व्यवहाराचे कौतुक झाले. कंपनी नंतर बुडीत निघाली, पण योग्य खबरदारी वेळीच घेतल्याने स्टेट बँक नुकसानातून वाचली हे वेगळे सांगायची गरज नाही.

**प्रबोध कुटुंब**

आप्पा आमच्या घरी अनेकदा यायचे. त्याकाळी पुण्यात आप्पांच्या मुळे अनेक कुटुंब जोडलेली होती. आमच्या कुटुंबाशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळे सर्व कुटुंबच प्रबोधिनीला जोडलेले होते. माझी दोन नंबरची बहीण - सौदामिनी/अनघा जोशी ही धारक विभागात काम करायची. मंदाकिनी/भाग्यश्री साने ही रंजनाताई अभंग यांच्याबरोबर आयुर्वेद विभागात काम करायची आणि जयश्री/जयश्री देसाई ही युवती विभागाच्या पहिल्या कार्यकर्त्यांमधील एक !

वं. वामनरावांनी प्रबोधिनी पद्धतीनी आमचा विवाह लावला आहे. सकाळी आठचा मुहूर्त होता. डिसेंबरच्या थंडीत मनोजराव त्यांना सकाळी ५.३० वाजता स्कूटरवरून घेऊन आले होते निगडीहून - मी स्वत: संस्कार विभागाचे काम अनेक वर्षे केलं आहे. गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळात गणेश प्राण प्रतिष्ठापना करायला जात असे, अथर्वशीर्षाचा अर्थ सांगत असे.


माझा मुलगा ओंकार याला लहानपणच्या एका आजारमुळे श्रवण दोष निर्माण झाला. पण एका सुहृदांच्या सांगण्यावरून आम्ही त्याला भावे हायस्कूलमध्ये सर्व सामान्य मुलांबरोबर शिकवले. बारावी नंतर नोकरी करून त्याने त्याचे



**योग व अध्यात्मात उंची गाठलेले वडिल**



**कर्तृत्ववान व कर्तव्यदक्ष – तेजस्वी ती. आई**



**वं. वामनरावांचा आशीर्वाद घेताना**



**माझ्या चार बहिणी व मी**



**पत्नी मेधा, सून प्रियांका व मुलगा ओंकार यांच्यासमवेत**

एमकॉम पर्यंतचे शिक्षण जिद्दीने व मेहनतीने पूर्ण केले. आता तो टेक महिंद्रा मध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंट व मॉनिटरिंग टीममध्ये आहे. तसेच माझी सून प्रियांका जोगळेकर हिलासुद्धा श्रवण दोष आहे. ती खूप मेहनतीने आर्किटेक्ट झाली असून एमपीएससी मधून निवड होऊन पुण्यात असिस्टंट टाऊन प्लॅनर – अधिकारी आहे.

**अध्यात्मिक वारसा**

आमच्या घराला तीन महान सत्पुरुषांचा आशीर्वाद आहे. पहिले माधवनाथ महाराज. हे नाथपंथीय योगी १८५७ ते १९३६ या काळात होऊन गेले. माझ्या आजोबा आणि आजीला त्यांचा प्रत्यक्ष अनुग्रह होता. दुसरे गोपाळ महाराज कसबेकर. हे पुण्यात मिल्ट्री अकाऊंटस्‌मध्ये फार मोठठया हुदयावर होते. माझ्या वडिलांना (श्री. विश्वनाथ सोहोनी) त्यांच्या सहवासात राहून प्रत्यक्ष 'योगाभ्यास' शिकायची संधी मिळाली आणि साईबाबांचा पण वडिलांच्या जीवनावर प्रभाव होता. मला वडिलांची अध्यामिक उंची १९८९ सालापासून विशेष जाणवली. तेव्हापासून २००४ पर्यंत पंधरा वर्षे मला त्यांचे खूप मोलाचे मार्गदर्शन मिळाले. हा माझ्या आयुष्यातला सोनेरी काळ होता असं मी म्हणेन. अध्यात्मातल्या या सगळ्या गोष्टी सोप्या, आपल्याला समजेल अशा भाषेत सांगायची त्यांची हातोटी होती.

माधवनाथ महाराजांचे खूप भक्त आहेत. पुण्यामध्ये त्यांचे दोन मोठे उत्सव, मी प्रबोधिनीमध्ये शिकलेली कौशल्ये वापरून आयोजित केले. तीन दिवसांचे पूर्ण नियोजन केले. दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर आणि गणपती मंदिर याची स्थापना माधवनाथ महाराजांनी केली आहे.

परतत्त्वाचे अनेक अनुभव मी घेतले आहेत. पण एक विशेष अनुभव सांगावासा वाटतो. एक वर्ष , दरवर्षी प्रमाणे अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीत मी सहभागी होतो. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मिरवणुकीत प्रबोधिनीचं पथक होत. लकडी पुलाच्या चौकात वाद्य विभागाचा टिपेचा ठेका चालू होता. अगदी climax point ला मी ध्वज घेतला व मागे– मागे नाचवत नेत, गणेश मूर्ती समोर नेला, शरीराचा कण अन् कण तालाशी पूर्ण एकरूप होऊन, बेभान होऊन ध्वज नाचवताना काहीतरी विलक्षण घडलं, सभोवतालचं भानच हरपलं. इतक्या गर्दीचा, कोलाहलाचा आवाजच हरपला. फक्त अप्रतिम ताल – मी,



**घरचे अध्यात्मिक अधिष्ठान – श्री महाराजांची गादी व चरण पादुका**



**अध्यात्मिक अनुभवांच्या 'केशवविश्व ... प्रचिती गुरुकृपेची' या मी व अन्य भक्तांनी लिहिलेल्या पुस्तक अनावरण प्रसंगी बोलताना**



**'माधवनाथ दीपप्रकाश' या पोथीचे माझ्या आवाजात रेकॉर्ड केलेल्या ऑडिओ सीडीचे अनावरण– विद्या वाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते सत्कार**

गणपती व ध्वज एवढ्याचीच जाणीव शिल्लक राहिली. गणपतीच्या डोळ्यात बघत ध्वज नाचवताना मी कधी 'त्याच्याशी' एकरूप झालो ते कळलंच नाही. एवढ्या गर्दीत, वाद्यांच्या आवाजात सुद्धा मी 'एकरूपते'चा व deep ध्यानाचा अनुभव घेत होतो. असा किती वेळ मी ध्वज नाचवला कळलं नाही. बघणाऱ्या लोकांच्या टाळ्यांच्या कडकडाटानी मी भानावर आलो. या प्रसंगाने माझ्या अध्यात्मिक प्रवासात मोठी जाणीव मला झाली की त्याच्याशी एकरूपतेसाठी बाह्य वातावरणापेक्षा आतलं जोडलं जाणं (connect) महत्त्वाचं आहे जे कुठेही होऊ शकतं अगदी कोलाहलात ही !!

बँकेच्या भारतातल्या सर्व ग्रामीण शाखांच्या संगणकीकरणाचे एक मोठे काम मी केलेल्या एका प्रयोगाने सुरू झाले. पश्चिम महाराष्ट्रातल्या सात जिल्ह्यांच्या ११६ ग्रामीण शाखांचे संगणकीकरण माझ्या नेतृत्वाखाली पूर्ण झालं. या आनंदात जेव्हा मी वडिलांना ती गोष्ट सांगायला गेलो तेव्हा त्यांनी एक प्रश्न विचारला, की काम तू एकट्याने केलस का? आणि पटकन डोळ्यासमोर आलं की या कामात हजारो हात सहभागी आहेत. हे माझ्याकडून घडायचे होते म्हणून माझी त्या ठिकाणी नेमणूक झाली हे त्यांनी अहंकार येऊ नये म्हणून जाणवून दिलं.

**आम्ही चालवू हा पुढे वारसा**

१९ ऑगस्ट १९९३ (गुरुवार) च्या सकाळच्या पुणे शहर आवृत्ती मध्ये 'गुरुजन' या सदरात 'माणसे घडवणारा कुशल शिल्पकार' हा लेख मी वं. आप्पांवर लिहीला होता.

वं. आप्पांच्या अनेक आठवणी आहेत, त्यातली एक अविस्मरणीय गोष्ट. मी तेव्हा सातवी–आठवीत असेन. एक दिवस शाळा आणि दल याच्या मधल्या वेळात आप्पा मला चतु:शृंगीला घेऊन गेले. तिथल्या पायऱ्यांवर बसून एक प्रश्न विचारला. एक ना एक दिवस प्रबोधिनीचे 'रूप पालटू देशाचे', हे स्वप्न पूर्ण होईल मग प्रबोधिनी बंद करायची का ? मी प्रश्न ऐकून गडबडून गेलो आणि प्रबोधिनी बंद करायची ही कल्पनाच मला सहन झाली नाही आणि उत्तर दिलं, बंद नाही करायची! मग बंद नाही करायची तर मग पुढे काय करायचे ? मला काहीच उत्तर सुचले नाही. त्यावर त्यांनी सांगीतलं, की 'भारत विश्वगुरु बनेल तेव्हा प्रबोधिनीने योगी अरविंदांच्या विचाराप्रमाणे मानवाचा महामानव कसा होईल यासाठी काम करायचे. मी तेव्हा नसेन आणि तुम्ही पण म्हातारे झाले असाल तर तुम्ही हे पुढच्या पिढी पर्यंत पोचवायचे आहे'. हा आप्पांचा इतकी वर्षं मनात बाळगलेला संदेश मी आज सर्व प्रबोधकांपर्यंत या लेखाद्वारे पोचवत आहे.

## RAPID FIRE

१. **आवडतं पुस्तक –**

१) Animal Farm (ॲनिमल फार्म) – जॉर्ज ऑरवेल, त्यातल All animals are equal but few are more equal – हे वाक्य मनात ठसलं आहे. २) रारंगढांग विसूभाऊंच्या सांगण्यावरून वाचलं होतं आणि ३) आता पुस्तकांच्या ऐवजी माणसं वाचायला आवडतात. बँकेच्या आणि इतर निमित्ताने अनेक ठिकाणी अनेक जण भेटत असतात.

२. **आवडता चित्रपट –**

Richard Attenborough यांचा 'गांधी' हा चित्रपट मला त्या वेळेस खूप आवडला होता. जवळपास पाच वेळा पाहिला होता. bridge on the river kwai आणि त्यावेळच्या वयानुसार 'दिवार'.

३. **आवडतं पर्यटन ठिकाण –**

वासोटा. प्रबोधिनीमुळे सह्याद्रीत मुक्त भटकंती केली आहे ... ते सर्वच ट्रेक्स, विशेषतः परदेशातील स्वित्झर्लंड

४. **मागे वळून बघताना –**

आयुष्यात घ्याव्या लागलेल्या कलाटणीमुळे स्टेट बँकेत नोकरी केली पण तिथे प्रबोधिनीत शिकलेली मूल्ये आणि कौशल्ये वापरली पण प्रबोधिनीत जे काम केले ते अतिशय आनंददायी होते.

५. **परत नव्याने काही करायचे असेल तर –**

भारतात/शाळांमध्ये 'आर्थिक साक्षरतेचे भान' यावर काम करायला आवडेल. भारतात याची खूपच गरज आहे. देशाचे रूप पालटायचे अस म्हणतो तर श्रीमंत झालं पाहिजे . गरीब देश काही समर्थ होणार नाही. त्यासाठी पैसा महत्त्वाचा. यामुळे तो सन्मार्गाने कमवायला आणि हाताळायला शिकवणे फार महत्त्वाचे.

६. **छंद** – भारतीय शास्त्रीय संगीत ऐकायला आवडत

७. **स्टेट बँक ऑफ इंडिया** – भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाठीचा कणा

८. **प्रबोधिनीतल्या व्यक्ती –**

१) वं. आप्पा – अक्षय प्रेरणा व ऊर्जा स्रोत

२) वं. आण्णा – अखंड कर्मयोगी

३) मा. गिरीशराव – शांत, स्थिर व निश्चित दिशेने काम – त्यांच्या प्रेरणेनी प्रबोधिनी आता जीवनाच्या सर्व दिशांमधे काम करत आहे.

४) आ. यशवंतराव, आ. वामनराव, शरदराव सुंकर, मोहनराव, विवेक कुलकर्णी (विकु), भाई फडके, सुभाषराव, अजितराव, विजय भांबुरकर तसेच नलूताई, लताताई, व विद्याताई हर्डिकर या सर्वांनीच अनेक अलौकिक संस्कार दिलेत. कायमच या सगळ्यांशी कृतज्ञ राहायला आवडेल.

५) अविनाश धर्माधिकारी – भान ठेऊन योजना आखणे व बेभान होऊन अमलात आणणे.

६) खास मित्रांपैकी प्रबोधिनीतील मनोज देवळेकर हा सोल मेट. महेन्द्रभाई, समीर दुबळे, मिलिंद संत हे जवळचे मित्र/कार्यकर्ते. शाळेतील मी, संजय रिसबुड, विश्वेश फणसळकर हे त्रिकूट तेव्हा फार प्रसिद्ध होतं.

**मयुरेश सोहोनी**
**99231 98072**
**m.v.sohoni@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – अजित कानिटकर व मानसी बोडस**

**संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर      आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org